News Release

# बोर्गवॉर्नरकडून डेल्फी टेक्नोलॉजीजचे संपादन पूर्ण

- इलेक्ट्रॉनिक्स व पॉवर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, क्षमता व प्रमाणाचे सक्षमीकरण
- बोर्गवॉर्नरची प्रगतीच्या दिशेने वाटचाल, जेथे इलेक्ट्रिफाईड प्रोपल्शन सिस्टम्सना मिळाली चालना
- प्रमुख कम्बशन, व्यावसायिक वाहन व आफ्टरमार्केट व्यवसायामध्ये वाढ

ऑबर्न हिल्स, मिशिगन, २ ऑक्टोबर २०२० - बोर्गवॉर्नर इन्क.ने (एनवायएसई:बीडब्ल्यूए) आज डेल्फी टेक्नोलॉजीजचे पूर्ण संपादन केले असल्याची घोषणा केली. बोर्गवॉर्नर व डेल्फी टेक्नोलॉजीजचा सहयोग बोर्गवॉर्नरची इलेक्ट्रॉनिक्स व पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, क्षमता व प्रमाण सक्षम करण्याची अपेक्षा आहे. ज्यामुळे बोर्गवॉर्नर इलेक्ट्रिफाईड प्रोपल्शन सिस्टम्समध्ये अग्रस्थानी असेल. बोर्गवॉर्नरला भावी प्रोपल्शन स्थलांतराचा लाभ घेण्यासाठी उत्तम स्थितीमध्ये असल्याचा विश्वास आहे.

"आम्हाला डेल्फी टेक्नोलॉजीजचे पूर्ण संपादन करण्याचा आनंद झाला आहे," असे बोर्गवॉर्नरचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी फ्रेडेरिक लिसाल्ड म्हणाले. "या सहयोगाच्या माध्यमातून बोर्गवॉर्नर उद्योगक्षेत्रातील अग्रणी प्रोपल्शन उत्पादने आणि कम्बशन, हायब्रिड व इलेक्ट्रिक वेईकल्सच्या अधिक व्यापक पोर्टफोलिओसह उत्तमरित्या स्थित आहे. आम्ही आशा करतो की, हा सहयोग आमचा व्यावसायिक वाहन व आफ्टरमार्केट व्यवसाय देखील सक्षम करेल. आम्ही जगभरातील डेल्फी टेक्नोलॉजीजच्या सहका-यांचे बोर्गवॉर्नर टीममध्ये स्वागत करतो. आम्ही सहयोगाने इलेक्ट्रिफिकेशनप्रती बाजारपेठ ट्रेण्ड्सची पूर्तता करण्यासाठी मिळणा-या संधींबाबत उत्सुक आहोत. आम्ही महामारीमधून मार्ग काढण्याचा आणि एकसंधी एकीकरणासाठी प्रबळ पाया स्थापित करण्याचा प्रयत्न करत असताना व्यवसायाला चालना देण्यासाठी अथक मेहनत घेतलेले आमचे जागतिक कर्मचारी, तसेच आमच्या एकीकृत नियोजन टीम्सचा मला अभिमान वाटतो. मला दृढ विश्वास आहे की, आम्हाला आमचे भागधारक, ग्राहक व पुरवठादारांसाठी या सहयोगाचे लक्षणीय लाभ समजण्यामध्ये मदत होईल."

**लक्षवेधक धोरणात्मक व आर्थिक लाभ:**

बोर्गवॉर्नर व डेल्फी टेक्नोलॉजीजच्या सहयोगामधून पुढील गोष्टी होण्याची अपेक्षा आहे:

- **बोर्गवॉर्नरची इलेक्ट्रॉनिक्स व पॉवर इलेक्ट्रॉनिक्स**, **क्षमता व प्रमाण सक्षम करण्याची अपेक्षा आहे. ज्यामुळे बोर्गवॉर्नर इलेक्ट्रिफाईड प्रोपल्शन सिस्टम्समध्ये अग्रस्थानी असेल. वोर्गवॉर्नरला भावी प्रोपल्शन स्थलांतराचा लाभ घेण्यासाठी उत्तम स्थितीमध्ये असल्याचा विश्वास आहे.** डेल्फी टेक्नोलॉजीज प्रमाणित उत्पादन, पुरवठा व ग्राहकवर्गासह उद्योगक्षेत्रातील अग्रणी पॉवर इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान व प्रतिभांची सुविधा देते. संयुक्त कंपनी ग्राहकांना पॉवर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांची (उच्च विद्युतदाबाचे कन्वर्टर्स, ऑन-बोर्ड चार्जर्स व बॅटरी मॅनेजमेंट सिस्टम्ससह) एकीकृत व स्वतंत्र ऑफरिंग्जची रेंज आणि क्षमता (सॉफ्टवेअर, सिस्टम्स इंटीग्रेशन व थर्मल मॅनेजमेंटसह) देईल.

- **बोर्गवॉर्नरच्या कम्बशन, व्यावसायिक वाहन व आफ्टरमार्केट व्यवसायांमध्ये वाढ.** डेल्फी टेक्नोलॉजीजची अनेक कम्बशन प्रोपल्शन उत्पादने बोर्गवॉर्नरच्या नाविन्यपूर्ण पोर्टफोलिओशी पूरक आहेत. या पोर्टफोलिओचे आधुनिक कम्बशन वेईकल्सची कार्यक्षमता व कामगिरी वाढवण्यासाठी शुद्ध तंत्रज्ञानांवर लक्ष केंद्रित आहे. डेल्फी टेक्नोलॉजीजच्या व्यावसायिक वाहन व आफ्टरमार्केट व्यवसायांची भर केल्यामुळे हलक्या वजनाची वाहने, व्यावसायिक वाहने व आफ्टरमार्केट व्यवसायांमध्ये अधिक संतुलन राखण्यास मदत करेल.

  जागतिक आफ्टरमार्केट ग्राहकांना बोर्गवॉर्नर व डेल्फी टेक्नोलॉजीजच्या व्यापक पोर्टफोलिओमधील ओई-दर्जात्मक आफ्टरमार्केट पार्टस्, सेवा, नैदानिक साधने व टेस्ट इक्विपमेंटचा लाभ मिळणे सुरूच राहिल. बोर्गवॉर्नरचा ब्रॅण्ड म्हणून डेल्फी टेक्नोलॉजीज आफ्टरमार्केट त्याची ब्रॅण्ड ओळख कायम ठेवेल आणि जगभरातील ग्राहक विक्री व ग्राहक सेवा पाठिंब्यासाठी त्यांच्या विश्वसनीय संपर्कांवर विश्वास ठेवू शकतील.

डेल्फी टेक्नोलॉजीजीच्या भागधारकांकडून मान्यता, आवश्यक नियामक मान्यतांची पोचपावती, डेल्फी टेक्नोलॉजीजच्या कर्जबारीपणाशी संबंधित विशिष्ट अटींची पूर्तता आणि कस्टमरी क्लोजिंग अटींची पूर्तता किंवा माफीनंतर हा व्यवहार पूर्ण करण्यात आला आहे. हा व्यवहार बंद झाल्यास, डेल्फी टेक्नोलॉजीजचा सामान्य स्टॉक न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजमध्ये व्यापार करणे बंद होईल.

## कॉन्फरन्स कॉल आणि प्रेझेन्टेशन मटेरिअल्स

गुरूवार ८ ऑक्टोबर २०२० रोजी संपादनासंदर्भातील अतिरिक्त माहितीसह सविस्तर कॉन्फरन्स कॉल http://www.borgwarner.com/en/Investors/default.aspx या वेबसाइटवर प्रसारित करण्यात येईल. तसेच संपादन प्रेझेन्टेशन http://www.borgwarner.com/en/Investors/default.aspx येथे उपलब्ध असेल.

## बोर्गवॉर्नर बाबत

बोर्गवॉर्नर इन्क. (एनवायएसई: बीडब्ल्यूए) ही कम्बशन, हायब्रिड व इलेक्ट्रिक वेईकल्ससाठी शुद्ध व कार्यक्षम तंत्रज्ञान सोल्यूशन्समधील जागतिक उत्पादन अग्रणी कंपनी आहे. मूळ उपकरण कौशल्यांना अधिक पुढे घेऊन जात बोर्गवॉर्नर जागतिक आफ्टरमार्केटमध्ये बाजारपेठ अग्रणी उत्पादन व सेवा सोल्यूशन्स देखील सादर करते. २४ देशांमधील ९९ ठिकाणी उत्पादन व तंत्रज्ञान सुविधा असलेल्या कंपनीचे जगभरात जवळपास ४८,००० कर्मचारी आहेत. अधिक माहितीसाठी कृपया borgwarner.com येथे भेट द्या.